पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १८

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/०१/२०१८** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०२/०१/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
४. मा.कदम निकिता अर्जुन
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.घुबे – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) मनपा शाळेतील महिला व मुलींना योगाचे प्रशिक्षण देणेबाबत – मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) महिला व मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षणास मुदतवाढ देणेबाबत – मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मनपा शाळेतील इ.५ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी बेटी बचाओ-बेटी पढाओ, महिला सुरक्षा कायदा, नियम मार्गदर्शिका पुस्तकांचे वाटप करणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) जागतिक महिला दिन साजरा करणेबाबत – मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.रेखा दर्शले    अनुमोदक – मा.योगिता नागरगोजे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि. ०२/०१/२०१८ ची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१६/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभापती -** मंगळवार दिनांक **१६/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १८

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०२/०१/२०१८ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **१६/०१/२०१८** वेळ – दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक **०२/०१/२०१८** ची तहकूब सभा मंगळवार दिनांक **१६/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकिता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.योगिता नागरगोजे                अनुमोदक – मा.वैशाली घोडेकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दि.**१६/०१/२०१८** ची तहकूब सभा मंगळवार दिनांक **३०/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभापती -** मंगळवार दिनांक **३०/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १८

**सभावृत्तांत**

**(** दिनांक **०२/०१/२०१८ व १६/०१/२०१८** ची तहकूब सभा **)**

दिनांक - **३०/०१/२०१८** वेळ – दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक **१६/०१/२०१८** ची तहकूब सभा मंगळवार दिनांक **३०/०१/२०१८** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**

२. मा.आंगोळकर सागर सुनिल

३. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

४. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

५. मा.लोखंडे चंदा राजू

६. मा.कदम निकिता अर्जुन

७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.आवारी – प्रशासन अधिकारी ( शिक्षण मंडळ ), मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **१९/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १७)** कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ३०/०१/२०१८

सुचक : मा.निकीता कदम अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेतील महिला व इ.५ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी नागरवस्ती विभागामार्फत स्वास्थ योगोपचार ॲन्ड योग मार्गदर्शन केंद्र यांचे वतीने महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून योगाचे प्रशिक्षण देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ३०/०१/२०१८

सुचक : मा.निकीता कदम अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेकामी पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ यांची १) वयोगट ५ ते १६, २) वयोगट १७ ते २६, ३) वयोगट २७ ते ४५ या तीन वयोगटातील महिला/मुलींना पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ यांना वस्ती पातळीवर प्रशिक्षण देणेकामी यापुर्वी महानगरपालिकेतर्फे नेमणुक करणेत आली होती. वस्तीपातळीवरुन सदरचे प्रशिक्षण सुरु करणेबाबत वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे तातडीने प्रशिक्षण सुरु करणे आवश्यक आहे. पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ हे मागील वर्षीच्या दरात काम करणेस तयार आहेत. त्यामुळे मागीलवर्षीच्याच दराने चालू वर्षी त्यांना काम देणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे आहे. तसेच त्यांनी चांगल्याप्रकारे काम केले आहे. त्यामुळे सन २०१७-१८ करीता पुणे जिल्हा स्पोर्टस् कराटे असोसिएशन, चिंचवड, पुणे – ३३ यांची महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेकामी मागील वर्षीचे दरात थेट पध्दतीने नेमणुक करणेस व सदरचे प्रशिक्षण हे मागील वर्षीच्याच अटी व शर्तीनुसार व कार्यपध्दतीनुसार व आवश्यकतेनुसार व मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने क्रीडा विभागामार्फत राबविणेस व सदर योजने अंतर्गत होणा-या प्रशिक्षणाचा खर्च नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेतील मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण या उपलेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर कामी जर जीएसटी (वस्तु व सेवा कर) देय असेल तर त्यानुसार रक्कम त्यांना अतिरिक्त (विहित दरा व्यतिरिक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ३०/०१/२०१८

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

बेटी बचाओ-बेटी पढाओ, महिला सुरक्षा कायदा, नियम मार्गदर्शिका २० एप्रिल २०१७ रोजी पुणे येथे आदरणीय अमृता फडणवीस आदरणीय सरकारी वकील श्री.उज्वल निकम, आदरणीय प्रविण दिक्षीत, महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालक यांच्या हस्ते महाराष्ट्रासाठी प्रकाशित झाली आहे. ही कायद्याची मार्गदर्शिका खुपच उपयुक्त असल्याने मनपा शाळेतील इ.५ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींसाठी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून विहित पध्दतीने खरेदी करुन वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ३०/०१/२०१८

सुचक : मा.निकीता कदम अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.निकीता कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्याप्रमाणे यावर्षी देखील ८ मार्च २०१८ हा जागतिक महिला दिन

साजरा करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५३/२०१८
दिनांक : ३१/०१/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.